# प्रसिध्दीपत्रक

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,

महाराष्ट्र राज्य, पुणे 411 001

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी जमात प्रमाणपत्र पडताळणीकरिता विशेष मोहिम

सन 2018-19 या शैक्षणिक वर्षात अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इ.10 वी 12 नंतर पदविका/पदवी अभ्यासक्रमाकरिता तसेच इतर अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेताना अनुसूचित जमाती वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता असते. सदर वैधता प्रमाणपत्राच्या आधारावर अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सवलती मिळू शकतात. राज्यात नुकताच इयत्ता 10 व 12 वी परीक्षेचा निकाल प्रसिध्द झाल्यामुळे विद्यार्थ्यांची विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी धावपळ सुरु झालेली आहे. परिणामी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या अंतर्गत अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडे (पुणे/नाशिक/नागपूर/ ठाणे/औरंगाबाद/ अमरावती/नंदूरबार व गडचिरोली) मोठया प्रमाणात शैक्षणिक कारणाकरिता अर्ज प्राप्त होत आहेत.

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने त्यांना अनुसूचित जमाती प्रमाणपत्र त्वरीत मिळण्याच्या दृष्टीने विशेष मोहिम आखण्यात आलेली आहे.

या मोहिमेंतर्गत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना e-Tribe पोर्टलवर https://www.etribevalidty.mahaonline.gov.in ऑनलाईन अर्ज केल्यानंतर प्राधान्याने वैधता प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येईल. या संदर्भात संबंधित समितीच्या पोलीस दक्षता पथकाला देखील गृह व शालेय चौकशीची व कागदपत्रांची पडताळणी करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे येथे Helpline No.020-26360941 सुरु करण्यात आलेला असून सकाळी 9.00 ते 7.00 या कालावधीत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दूरध्वनीवरुन वैधता प्रमाणपत्राबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. सर्व आठही अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांमध्ये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष कक्षामार्फत आवश्यक ती माहिती पुरविण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. तसेच सदर मोहिमेच्या कामकाजाचा वरिष्ठ व अति वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून दैंनदिन आढावा घेतला जात असून अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना त्वरीत वैधता प्रमाणपत्र मिळण्याच्या दृष्टीने सर्व

प्रक्रीया पूर्ण करुन आवश्यक ती खबरदारी घेण्यात येत आहे. सर्व समित्यांच्या स्तरावर अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी दूरध्वनी सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या व त्यांचे कार्यक्षेत्र तसेच संपर्क दूरध्वनी खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | समितीचे ठिकाण | पत्ता व दूरध्वनी क्रमांक | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| 1. | पुणे | 28, क्वीन्स गार्डन, पुणे 1<br>020-26336961 | पुणे, सांगली, सातारा, सोलापूर व कोल्हापूर |
| 2. | ठाणे | वर्तकनगर प्रभाग समिती कार्यालय, वर्तकनगर, ठाणे (पश्चिम), ठाणे<br>022-25883503 | ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग |
| 3. | नाशिक | आदिवासी विकास भवन, जुना आग्रा रोड, नाशिक 422002<br>02532577059 | नाशिक व अहमदनगर |
| 4. | औरंगाबाद | सेंट लॉरेन्स हायस्कूलजवळ, टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद<br>दूरध्वनी क्र.0240-2362901 | औरंगाबाद, हिंगोली, परभणी, जालना, नांदेड, बीड, लातूर व उस्मानाबाद |
| 5. | अमरावती | शासकीय विश्रामगृहाजवळ, राज्य माहिती आयुक्त यांचे कार्यालयासमोर, सना हाऊस, जुना बायपास रोड, चपराशीपुरा, अमरावती 444602<br>दूरध्वनी क्र.0721-2550995 | अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशिम आणि यवतमाळ |
| 6. | नागपूर | आदिवासी विकास भवन, गिरी पेठ, नागपूर<br>दूरध्वनी क्र.0712 2560031 | नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया |

| अ.क्र. | समितीचे ठिकाण | पत्ता व दूरध्वनी क्रमांक | कार्यक्षेत्र |
| --- | --- | --- | --- |
| 7. | नंदूरबार | शासकीय दूध डेअरी, इमारत, आरटीओ जवळ, नंदूरबार<br>02564 210130 | धुळे, नंदूरबार, जळगांव |
| 8 | गडचिरोली | जिल्हा परिषद कॉलनी, कॉम्पलेक्स, गडचिरोली 442605<br>07132 223179 | गडचिरोली व चंद्रपूर |

आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे